## नियमित दिवाणी दावा क्र. १०५/२०१८ मधील नि.१६८ वरील आदेश

(आदेश पारित दिनांक ०९/०६/२०२५)

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीच्या कथनांप्रमाणे प्रस्तुत दाव्यामध्ये टंकलिखित दोषाने प्रतिवादी क्र.५, ६, ४२ यांची नांवे अनुक्रमे **श्रीमती विठाबाई विश्राम सावंत पुर्वाश्रमीची विठाबाई बाबू दळवी, श्रीमती बयाबाई महादेव सावंत पुर्वाश्रमीची बयाबाई बाबू दळवी व श्री बाबू सखाराम दळवी** अशी नमुद झालेली आहेत. सदरची दुरुस्ती न झालेस वादी यांचे न्यायहितावर गदा येऊन वादी यांचे पैशाचा स्वरुपात भरुन न येणारे नुकसान होणार आहे. वादी यांनी दाव्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता वर नमुद प्रतिवादींची नांवे **प्रतिवादी क्र.५ अंजनी विश्राम सावंत, प्रतिवादी क्र.६ गिरीजा महादेव सावंत व प्रतिवादी क्र.४२ बाबूराम सखाराम दळवी** अशी दिसून येतात. त्यामुळे वादी यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे नि.१ वर प्रतिवादी क्र.५, ६, ४२ यांची नांवांमध्ये अनुक्रमे **प्रतिवादी क्र.५ अंजनी विश्राम सावंत, प्रतिवादी क्र.६ गिरीजा महादेव सावंत व प्रतिवादी क्र.४२ बाबूराम सखाराम दळवी** अशी दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन आवश्यक तो आदेश पारीत करणेची विनंती केलेली आहे.

४. अभिलेख, अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादीने सरस निरस धडेवाटपाकरीता दाखल केला आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची

दिसून येते. सदरचा दावा हा प्राथमिक टप्प्यावर आहे. त्यामुळे दुरुस्ती केल्यास कोणत्याही स्वरुपाचे नुकसान प्रतिवादींना होणार नाही. याउलट दाव्यातील दुरुस्ती मंजूर केलेस उभय पक्षकारांमधील वादाचा अंतिमरित्या गुणदोषावर निर्णय होण्यास मदत होणार आहे आणि त्यामुळे दाव्याचे स्वरूप बदलत नाही असे माझे मत आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**–:: <u>आदेश</u> ::–**

१. वादीचा निशाणी क्र.१६८ वरील अर्ज मंजूर करणेत येतो.

२. वादीने प्रस्तुत अर्जात नमूद केलेप्रमाणे दाव्यामध्ये दुरूस्ती करून दाव्याची दुरूस्त प्रत अभिलेखावर पुढील तारखेस वा तत्पूर्वी दाखल करावी.

३. सदरचा खर्च वादीने सोसणेचा आहे.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर )

KUMBHAR RANJANA GOVIND
Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2025.06.10 10:59:15 +0530

दिनांकः– ०९/०६/२०२५
ठिकाणः– सावंतवाडी

(श्रीमती आर. जी. कुंभार)
सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर),
सावंतवाडी.